श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

# Nit Document

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.

**महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या**
**गायीच्या शुध्द तूपाच्या खरेदीसाठी ई–पुर्ननिविदा मागविण्याबाबत.**

**गायीचे शुध्द तूप पुरवठा कालावधी**
**एप्रिल, २०२५, ते दिनांक ३१ मार्च, २०२६, पर्यंत**

### ई–पुर्ननिविदा सूचना :

मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारे महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या गायीच्या शुध्द तुपाच्या खरेदीसाठी ई–पुर्ननिविदा मागविण्यात येत आहेत. ई–पुर्ननिविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| ई–पुर्ननिविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | –: | मंगळवार २९ एप्रिल, २०२५ |
| ई–पुर्ननिविदापुर्व बैठक वार व दिनांक | –: | सोमवार ०५ मे, २०२५ दु. ३ वा. |
| कच्चा माल नमुना तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | –: | बुधवार ०७ मे, २०२५ सायं. ६ वा. |
| ई–पुर्ननिविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | –: | बुधवार १४ मे, २०२५ सायं. ५ वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | –: | शुक्रवार १६ मे, २०२५ दुपारी २.०० वा. |
| गायीच्या तुपाची मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | –: | गुरुवार २२ मे, २०२५ दुपारी ३.०० वा |
| स्थळ | –: | श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, तिसरा मजला, न्यास कार्यालय, |

सही/–
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

**महाप्रसाद बनविण्यासाठी लागणाऱ्या गायीच्या तुपाच्या खरेदीसाठी ई–पुर्ननिविदा मागविण्याबाबत.**

गायीचे शुध्द तूप पुरवठा कालावधी एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत.



| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सुचना, वार, दिनांक, वेळ | २ |
| २ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे व न्यासास सादर करावयाची कागदपत्रे | ३ |
| ३ | निविदेची किंमत/शुल्क, बयाणा रक्कम, पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती | ४ |
| ४ | गाईचे शुध्द तूप (Pure Cow Ghee)<br>गायीच्या शुध्द तुपाचे मापदंड तथा वैशिष्टये (Specification)<br>Grade Specification (Quality) of Ghee | ५ ते ६ |
| ५ | तांत्रिक ई–निविदेच्या अनुषंगाने गुणांकन प्रक्रिया | ७ |
| ६ | नमुना तपासणी कार्यपध्दती | ८ ते ९ |
| ७ | निविदाधारकाबाबतची माहिती | १० |
| ८ | हमीपत्र | ११ |
| ९ | मागिल ३ वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र | १२ |
| १० | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) मुळ निविदेचा तपशील | १३ |
| ११ | अटी व शर्ती | १४ ते १९ |

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

**अ) तांत्रिक कागदपत्रे (तांत्रिक–Technical)**

१. निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावतीची प्रत

२. बयाना रक्कम जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावतीची प्रत

३. राष्ट्रीयकृत/अनुसूचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate)

४. अद्ययावत कंपनी नोंदणी दाखला/दुकाने नोंदणी दाखला

५. भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण अद्ययावत प्रमाणपत्र (Fssai Registration Updated Certificate)

६. ॲगमार्क परवाना (गाईच्या शुध्द तुपाकरीता)

७. आयकर नोंदणी पॅन कार्ड

८.सेवाकर नोंदणी दाखला (GST Registration)

९. मागील ३ वर्षाचा (आर्थिक वर्ष २०२१–२२, २०२२–२३, २०२३–२४) आयकर व सेवाकर परतावा (IT & GST Returns)

१०.आर्थिक वर्ष २०२१–२२, २०२२–२३, २०२३–२४ या तीन आर्थिक वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र (पान क्र. १२ वरील नमुन्यानुसार)

११. सन २०२३–२०२४ वार्षिक उलाढालीबाबत लेखा परिक्षण अहवाल (Audited Balance sheet)

१२. निविदाकार ज्या संस्थेच्या नावे निविदा भरणार आहे त्या संस्थेत निविदाकार हा भागीदार असेल तर या संदर्भातील कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती

१३. गायीचे तुप पुरवठा करण्याचा तीन वर्षाचा अनुभव दर्शविणारी कागदपत्रे (कार्यादेश/पुरवठा आदेश/देयकाच्या प्रती किंवा तत्सम कागदपत्रे)

१४. हमी पत्र

१५. निविदाकारास कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थेमध्ये मालाचा पुरवठा प्रकरणी काळ्या यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्या विरूध्द न्यायालयात कोणताही दावा अथवा प्रकरण प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

१६. निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत

**(वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती तांत्रिक निविदा उघडतेवेळी न्यासास सादर कराव्या.)**

**ब) मुल्य निविदा (वाणिज्यिक–Commercial) BOQ तांत्रिक निविदेत अपलोड करू नये. ती स्वतंत्रपणे भरण्यात यावी.**

## निविदा शुल्क व बयाणा रकमेबाबतचे जोडपत्र "अ"

| अ. क्र. | कच्चा माल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजे माल | निविदेची किंमत/शुल्क (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तूप **(Agmark)** | २,८०,८०० लिटर | २५,०००/– | १२,००,०००/– |

टिप : वर नमूद मालाचे प्रमाण हे अंदाजित आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते.

## पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती

| अ. क्र. | कच्चा माल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजे माल | पतदारी दाखला **(Solvency certificate)** रक्कम (रु.) | मागील ३ वर्षाची सरासरी आर्थिक उलाढाल रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (इ) | (फ) |
| १ | गाईचे शुध्द तूप (Agmark) | २,८०,८०० लिटर | एकुण पुरवठा मालाच्या वार्षिक किंमतीच्या ३० टक्के रक्कम | किमान १८,८५,००,०००/– |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## गाईचे शुध्द तूप (Pure Cow Ghee)

## गायीच्या शुध्द तुपाचे विनिर्देश (Specification)

## Grade Specification (Quality) of Ghee under AGMARK

***Method for determination of adulteration of vegetable oil in ghee by RP-HPLC as notified vide FSSAI office order: File No. 1-90/FSSAI/SP (MS&A)2009 Dated 25th march,2019**

**78[Table 1. The fatty acid composition of ghee as determined by GLC ( expresed as percentage of total fatty acids)**

| Sr.No. | Type of fatty acid | Fatty acid composition (percentage) |
|---|---|---|
| | Saturated fatty | |
| 1 | C4:0, Butyric acid | 1-5 |
| 2 | C6:0, Hexanoic acid (Caproic acid) | 0.5-2.2 |
| 3 | C8:0, Octanoic acid (Cacprylic acid) | 0.4-1.5 |
| 4 | C10:0, Decanoic acid (Capric acid) | 0.8-5 |
| 5 | C12:0, Dodecanoic acid (Lauric acid) | 1.5-4 |
| 6 | C14:0, Tetradecanoic acid (Myristic acid) | 6-13 |
| 7 | C16:0, Hexadecanoic acid (Palmitic acid) | 22-38 |
| 8 | C18:0, Octadecenoic acid (Stearic acid) | 8-19 |
| Mono-unsaturated fatty acids | | |
| 9 | C16:1, (Cis 9), Hexadecanoic acid (Palmitoleic acid) | 0.9-2.8 |
| 10 | C18:1, ( cis 9 ) 9- Octadecenoic acid ( Oleic acid) | 19-32 |
| Poly-unsaturated fatty acids | | |
| 11 | C18:2, ( cis 9,12 ) 9-12-Octadecadienoic acid (Linoleic acid) | 0.5-3.5 |
| 12 | C18:3, (cis 9.12.15) 9,12,15-Octadecatrienoic acid | 0.3-10".] |

**FBOs to comply with the specified fatty acid composition of ghee after two years of publication of these regulations in the Official Gazette (F. No.M&MP/Notification (05) FSSAI-2019 DATE 27th December 2021)]**

**3. Food Additives. –**

**For products covered under this standard, specific food additives permitted in Appendix ßAÞ of these regulations may be used and only within the limits specified.**

**4. Contaminants, Toxins and Residues.**

**The product shall comply with the limits stipulated under the Food Safety and Standared (Contaminants, toxins and Residues) Regulations, 2011.**

**5. Hygiene. –**

**The Product shall be prepared and handle in accordance with the requirements specified in schedule 4, as applicable, of the food safety**

**The standards of quality of milk fat, butter anhydrous milk fat, anhydrous butter oil and ghee shall conform to the following reqirements: -**

| 78[ß Parameter | Milk Fat, Butter Oil | Anhydrous Milk Fat, Anhydrous Butter Oil | Ghee |
|---|---|---|---|
| Moisture, maximum, % (m/m) | 0.4 | 0.1 | 0.5 |
| Milk fat, minimum% (m/m) | 99.6 | 99.8 | 99.5 |
| Butyro-refractometer Reading at 40*C | 40.0 to 44.0 | 40.0 to 44.0 | 40.0 to 44.0 |
| Reichert Meissl Value minimum | 24.0 | 24.0 | 24.0 |
| Polenske Value | 0.5 – 2.0 | 0.5 – 2.0 | 0.5 – 2.0 |
| FFA as Oleic Acid maximum% | 0.4 | 0.3 | 2.0 |
| Peroxide Value (Milk- equivalent of Oxygen/Kg fat), maximum | 0.6 | 0.3 | - |
| Baudouin Test | Negative | Negative | Negative |
| Iodine Value | - | - | 25-38 |
| Saponificationvalue | - | - | 205-235 |
| Presence of B-sitostosterol | Absent* | Absent* | Absent* |
| Fatty acid composition | - | - | The product shall meet the requirement of Table 1 |

# तांत्रिक निविदेच्या अनुषंगाने गुणांकन प्रक्रिया

महाप्रसाद बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गायीच्या तूपाची गुणवत्ता उत्तम, दर्जेदार व १००% शुध्दता, असावी म्हणून निविदा प्रक्रियेकरीता न्यासातर्फे डेअरी तज्ञ सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रक्रीयेमध्ये सहभाग घेणाऱ्या निविदाकारांच्या प्रथम तांत्रिक निविदा उघडून कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या सर्व निविदाकारांच्या तुपाच्या प्लांटची पाहणी करण्यात येईल. तुपाच्या प्लांटची पाहणी हा तांत्रिक निविदेचा भाग असेल. कागदपत्रांची पुर्तता करीत असलेल्या निविदाकारांच्या न्यासाने नियुक्त केलेली समिती डेअरी प्लांटला भेट देतील. सदर भेटी दरम्यान निविदाकारांच्या डेअरीमध्ये तयार करण्यात येणारे तूप हे केंद्र सरकार (FSSAI) व महाराष्ट्र शासन (FDA) यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बनविण्यात येत आहे किंवा कसे? तसेच डेअरीची स्वच्छता याची पाहणी करतील. डेअरीची पाहणी करताना न्यासाचे डेअरी तज्ञ सल्लागार यांनी तयार केलेल्या तपासणी सुचीनुसार (Check List) गुणांकन करण्यात येईल. सदर गुणतालिका १०० मार्कांची असून, १०० पैकी ८० पेक्षा कमी गुण मिळणाऱ्या निविदाकारांची निविदा तांत्रिकदृष्टया अपात्र ठरविण्यात येईल. तसेच मूल्य निविदा उघडताना ८० पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या निविदाकारांमध्येच गुणांकन तसेच मुल्यांकनाच्या आधारे स्पर्धात्मक पध्दतीने न्यूनतम (एल–१) निविदाकाराची निवड करण्यात येईल. याबाबत निविदाकारांची कोणतीही सूचना, मत किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

## गुणांकन विभागणी खालीलप्रमाणे

1. LOCATION AND LAYOUT OF FOOD ESTABLISHMENT **(10 marks)**
2. EQUIPMENT AND FIXTURES **(10 marks)**
3. PERSONAL HYGIENE **(20 marks)**
4. FOOD OPERATIONS & CONTROL **(20 marks)**
5. FOOD TESTING FACILITY **(10 marks)**
6. CLEANING AND MAINTENANCE **(20 marks)**
7. PEST CONTROL SYSTEM **(10 marks)**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

## नमुना तपासणी कार्यपध्दती

१) ई–निविदा धारकाने त्यांच्या तुपाचे नमुने प्रत्येकी ५००मी.ली. (अर्धा लिटर) दि. ७ मे, २०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत न्यासाच्या प्रतीक्षालय इमारतीतील तळमजल्यावरील टपाल कक्षात जमा करणे आवश्यक राहील. निविदाकाराने तपासणीसाठी येणाऱ्या रुपये १७८०/- खर्चाची रक्कम अभिषेक नोंदणी कक्षात भरून त्याची पोच घ्यावी. तपासणीसाठी कच्च्या मालाचे नमूने दिनांक ७ मे, २०२५ नंतर सादर करणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
सदर नमून्यावर निविदाकाराने खालीलप्रमाणे माहिती भरून चिकटवणे आवश्यक राहील.
निविदाकाराचे नाव –:
नमून्याचे नाव –:
नमून्याचे प्रमाण –: ५००मी.लि. (अर्धा लिटर)
सादर केल्याचा दिनांक –:
वेळ–:

२) तपासणीसाठी सादर करावयाचे नमुने हे प्लांन्टमधील चालू उत्पादनातील ताजे तुप बंद बाटलीतून पाठवावे. तसेच नमुने काचेच्या एक लिटरच्या बरण्यांमध्ये भरुन त्यावर उत्पादनाचा दिनांक व बॅचकोड इ माहिती सविस्तरपणे नमुद केलेली असावी. बाजारातील विक्रीचे पॅक नमुना म्हणुन स्वीकारले जाणार नाही. प्रयोगशाळा तपासणी अहवालाच्या निकषाच्या आधारे निविदा अंतिम करण्यात येईल.

३) न्यासास पुरवठा केलेल्या गायीच्या तुपाची तपासणी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाकडील प्रयोगशाळेतून अथवा अन्न व औषध प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेतून करण्यात येईल. प्रयोगशाळेच्या तपासणीअंती प्राप्त अहवाल निविदा अंतिम करताना उघडण्यात येईल.

४) तांत्रिक निविदा उघडल्यानंतर जे निविदाकार तांत्रिकदृष्टया आवश्यक कागदपत्रे सादर करतील. त्यांची प्रत्यक्ष डेअरी तपासणी डेअरी विशेषज्ञ, न्यास अधिकारी व विश्वस्त यांच्या उपस्थितीत करण्यात येईल. तद्नंतर डेअरी तपासणीच्या गुणांकनानुसार वाणिज्यिक निविदा उघडण्यात येईल. सदर पाहणी दरम्यान खालील बाबी सदरील प्लांटमध्ये आहेत की नाही याची तपासणी करून गुणांकन करण्यात येईल. त्यानंतर न्यूनतम निविदाकार अंतिम करण्यात येईल.

I) निविदाकार यांचे स्वत:चे गायीचे दूध संकलन करण्याचे केंद्र/व्यवस्था असावे.
II) संकलित केलेल्या गायीच्या दुधावर स्वत:च्या प्लांटमध्ये अत्याधुनिक प्रक्रिया करून त्यापासून गायीचे तूप करण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.
III) सदर प्लांट एफ.एस.एस.ए.आय (FSSAI) मान्यताप्राप्त (Approved) व हायजिनिक दृष्टया स्वच्छ असावा.

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org

(The bidder for supply of cow ghee should have his own cow milk procurement system and facility for conversion of the same milk into cow ghee should exists in own plant. The plant should be FSSAI approved.)

IV) गायीचे तूप बनविण्यासाठी लागणारे क्रीम/बटर तयार करण्याचे यूनिट निविदाकाराचे स्वत:चे असावे.

V) तूप तयार करण्यासाठी क्रीम किंवा बटर बाहेरून विकत घेतलेले नसावे. तसेच दुधापासून तूप बनविण्याची यंत्रणा स्वत:ची असावी.

VI) सदर यंत्रणेमार्फत बनविण्यात येणाऱ्या गाईच्या तुपाच्या उत्पादनाची क्षमता ही न्यासाला वार्षिक तूप पुरवठा करावयाच्या दहापट क्षमतेची असावी.

VII) दररोज एकूण दूध संकलन आणि दुग्धजन्य पदार्थांची तपासणी FSSAI किंवा EIC (Export Inspection Council) यांनी केलेली असावी. डेअरी प्लांटची प्रत्यक्ष पाहणी करताना याबाबतचा परिक्षण अहवाल तपासण्यात येईल.

VIII) महाप्रसादाकरीता लागणाऱ्या गायीच्या तूपाचा पुरवठा सातत्याने व वेळेतच होण्यासाठी गायीच्या तुपाचे निविदाधारक/उत्पादक यांचे प्लान्ट हे महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक राहील.

IX) निविदेतील दर हे कर वगळून असावेत

X) ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे.

# निविदाधारकाबाबत माहिती

१) फर्मचे/कंपनीचे नांव :————————————————

२) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :————————————————
————————————————
————————————————

३) संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक
अ) ऑफीस :————————————————

ब) दुकान :————————————————

क) मोबाईल क्रमांक :————————————————

ड) फॅक्स क्रमांक :————————————————

इ) ई–मेल :————————————————

४) संपर्कासाठी व्यक्तीचे नांव :————————————————

मोबाईल क्रमांक :————————————————

५) मालकाचे / भागीदारांची नावे : अ) ————————————————

ब) ————————————————

६) सेवाकर क्रमांक **(GST No.)** :————————————————

७) आयकर नोंदणी पॅन क्रमांक :————————————————

(फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर)

## हमीपत्र

प्रति,
कार्यकारी अधिकारी,
श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

महोदया,

मी/आम्ही ——————————————————————————

खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार महाप्रसाद विभागासाठी लागणारा कच्चा माल आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर पुरवठा करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये सेवाकर (जी.एस.टी.) वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहीत केल्यानुसार Bank Guarantee देण्यास बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रम यांनी यापूर्वी आमच्या मालाचा पुरवठा करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

दिनांक :        /        /२०२५

निविदाधारकाची सही व शिक्का

## (सनदी लेखापालाचे लेटरहेडवर)

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ———————————————————— यांच्या व्यवसायाची वर्ष २०२१–२२, २०२२–२३, २०२३–२४ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी ( आर्थिक वर्ष ) | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२१–२२ | |
| २ | वर्ष २०२२–२३ | |
| ३ | वर्ष २०२३–२४ | |
| | | |
| | एकूण उलाढाल | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :– / / २०२५

ठिकाण :–

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड काऊंटन्ट

(नाव/सही शिक्का)

दिनांक – / / २०२५

## मुल्य निविदा (वाणिज्यिक–Commercial) बीड ऑफ कोटेशन (BOQ)

निविदेमध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव :________________________________

निविदाधारकाचा कायमचा पत्ता :________________________________

________________________________

निविदाधारकाचा सेवाकर
नोंदणी क्रमांक (GST No.) :________________________________

| अ. क्र. Sr. No. | मालाचे नांव Goods Name | नमूद कालावधीतील अंदाजे परिमाण Approximate Quantity in the specified period | दर (रू) प्रति लिटर (सेवाकर वगळून) Rate per Ltr (Excluding GST) | नमूद कालावधीत पुरवठा करावयाच्या मालाचे मुल्य (रू) Estimated cost of whole supply |
|---|---|---|---|---|
| (अ) A | (ब) B | (क) C | (ड) D | (इ) E |
| १ | गाईचे शुध्द तूप (Agmark) | २,८०,८०० लिटर | | |

निविदाधारकाची सही व शिक्का

उपरोक्त मूल्य निविदेचे प्रारूप केवळ माहितीकरीता सोबत देण्यात आले आहे. मात्र सदरील तक्त्यातील माहिती तांत्रिक निविदेसोबत अपलोड करू नये. ती स्वतंत्रपणे मुल्य निविदेच्या विहित नमुन्यात भरण्यात यावी.

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org
mahaprasad@siddhivinayak.org


## अटी व शर्ती

१) गायीच्या तुपाच्या पुरवठयाचा कालावधी हा प्रथम पुरवठा आदेश दिनांकापासून ते ३१ मार्च २०२६, अखेर पर्यंत वैध राहील. तथापि कार्यदिशाचा कालावधी संपल्यानंतर पुढील वर्षाकरीता गायीच्या तुपाच्या पुरवठयासाठी निविदा प्रक्रियेद्वारा नविन निविदाकाराची नेमणूक होईपर्यंत वा त्याने गायीच्या तुपाचा पुरवठा सुरु करेपर्यंत पुरवठादारांस वरील कालावधीसाठी विहित केलेल्या दरातच गायीच्या तुपाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील व त्याकरिता कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. तसेच कालावधीबाबतचा न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

२) ई–निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाकाराने पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा करावयाच्या एकूण गायीच्या तुपाच्या किंमतीच्या ५% रक्कमेची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करणे बंधनकारक आहे. न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम वजा करुन उर्वरीत रकमेकरीता बॅक गॅरेंटी स्विकारण्यात येईल. बॅक गॅरेंटी राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेची असणे आवश्यक आहे.

३) ई–निविदा अपलोड करतेवेळी निविदेची किंमत/शुल्क रू. २५,०००/– व बयाना रक्कम रू. १२,००,०००/– ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रकमेवर व्याज अनुज्ञेय होणार नाही. निविदेसोबत राष्ट्रीयीकृत वा अनुसूचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. पतदारी दाखला तसेच निविदाधारकाची आर्थिक उलाढाल ही पान क्र. ४ वर नमूद केल्याप्रमाणे असावी.

४) निविदाकार हा व्यापारी (Trader) अथवा सी एन एफ एजंन्ट नसावा, अथवा असल्याचे आढळल्यास निविदाकाराची निविदा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५) ई–निविदेत तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेले निविदाकार निविदेतील अटींची/मापदंडाची पूर्तता करीत आहेत किंवा कसे याची खात्री करण्यासाठी न्यास व्यवस्थापन समिती सदस्य, अधिकारी व न्यासाचे सल्लागार प्रत्यक्ष डेअरी प्लांटची पाहणी करून अहवाल सादर करतील.

६) गायीच्या तुपाचा पुरवठा फक्त १६.४८० लिटर चा एक डबा याप्रमाणे Food Grade Tin Lacqered पत्र्याच्या सिलबंद डब्यातून पुरविणे बंधनकारक राहिल. आवश्यकतेनुसार न्यास व्यवस्थापन समिती निर्णय घेऊन एकत्रित पुरवठा (Bulk) करणेबाबत निर्देशित करू शकते.

७) गायीच्या तुपाचे गुणधर्म, विनिर्देश व इतर मापदंड (Parameters) हे **"NABL ACCREDITED LAB - APPROVED BY OR NOTED BY FSSAI"** प्रयोगशाळेतून तपासणी केलेले असावे.

८) ई–निविदेसोबत तपासणीकरीता गायीच्या तुपाचे जे नमुने दिले असतील त्या नमुन्यांची प्रयोगशाळा तपासणी केल्यानंतर जे मापदंड (Parameters) येतील तेच मापदंड (Parameters) गायीच्या तुपाचा पुरवठा करताना प्रत्येक डिलिव्हरी (Consignment) मध्ये असले पाहिजेत. जर त्यात तफावत असेल तर ते सर्व गायीचे तूप स्वखर्चाने परत घेऊन जाणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

९) आपणाकडून ज्या बॅच नंबरच्या मालाचा पुरवठा केला जाणार आहे त्या बॅच नंबरच्या नमुन्याची एन.बी.एल प्रमाणित प्रयोगशाळेकडून तपासणी करून त्याचा अहवाल पुरवठा मालासोबत करणे बंधनकारक असेल प्रमाणित तपासणी अहवालासोबतच पुरवठा माल स्विकारला जाईल. याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. न्यासास पुरवठा केलेल्या गायीच्या तुपाची न्यासाकडून अनपेक्षितपणे प्रयोगशाळा तपासणी करण्यात येईल. सदर तपासणी बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाकडील प्रयोगशाळेतून अथवा अन्न व औषध प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेतून करणेत येईल. त्याकरीता होणारा खर्च आपण सादर केलेल्या देयकातून वजा करुन देयक अदा करण्यात येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. FSSAI standards किंवा निविदेतील Specification (पान क्र. ५ व ६) नुसार गायीच्या तुपाची पूर्तता करावी लागेल. पुरविण्यात आलेले गायीचे तूप FSSAI standards किंवा निविदेतील Specification (पान क्र. ५ व ६) नुसार नसल्यास अशा पुरवठा केलेल्या गायीच्या तुपासंदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**अ)** पुरवठादाराचा करार तात्काळ रदद् करून नव्याने ई–निविदा प्रक्रिया करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीस राहील. या विरोधात कुठल्याही लवादासमोर दाद मागता येणार नाही.

**(ब)** अपात्र/सदोष वापरलेल्या गायीच्या तुपाचे देयक अदा करताना त्यामधून २०% कपात दंड म्हणून करण्यात येईल.

**(क)** न्यासास पुरवठा केलेला अपात्र/सदोष गायीचे तूप एका आठवडयामध्ये स्वखर्चाने व जबाबदारीने परत नेणे पुरवठादारावर बंधनकारक असेल, अशा परत न नेलेल्या गायीच्या तुपाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी न्यासावर असणार नाही व अशा पुरवठा केलेल्या गायीच्या तुपाच्या अनुषंगाने कोणतीही प्रदान/अदायगी केली जाणार नाही.

**(ड)** अपात्र/सदोष ठरलेले गायीचे तूप परत घेवून त्याऐवजी गुणवत्तेचा व दर्जेदार गायीचे तूप कमाल चार दिवसांत पुरविणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील. विहित कालावधीत अशा गायीच्या तुपाचा पुरवठा न केल्यास अन्य पुरवठादाराकडून अथवा बाजारभावाने गायीचे तूप मागविण्याची मुभा न्यासास राहील. याबाबत आपली कोणतीही तक्रार चालणार नाही.

**(इ)** कोणत्याही प्रकारे उद्‌भवलेल्या प्रसंगामुळे/परिस्थितीमुळे पुरवठादाराने तुप पुरवठा करावयाचे नाकारल्यास मंदिरातील महाप्रसाद तयार करण्याची प्रक्रिया निरंतर सुरू राहण्यासाठी पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत खुल्या बाजार भावाने शुध्द गायीच्या तुपाची खरेदी करण्यात येईल. व सदर

पुरवठादारांची **(EMD)** बयाना रक्कम जप्त करून पुरवठादारास काळया यादीत अंतर्भुत करण्यात येईल.

१०) न्यासाच्या खरेदी विभागाच्या आदेशाप्रमाणे वेळोवेळी गायीचे तूप पुरवावे लागेल. आवश्यकतेनुसार दरमहा अथवा कमी जास्त मुदतीत गायीच्या तुपाची मागणी केली जाईल. एकदम सर्व गायीचे तूप घेतले जाणार नाही. मागणीनुसार आलेले गायीचे तूप स्विकारले जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेले गायीचे तूप स्विकारले जाणार नाही.गायीच्या तुपाचा पुरवठा करावयाचे परिमाण अंदाजे असल्याने, न्यासाकडून प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

११) निविदाकाराने गायीच्या तुपाची पोहोच स्वखर्चाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे न्यासाचे खरेदी विभागाच्या गोडाऊनमध्ये पॅकींग व फॉरवर्डींगसह दिली पाहिजे. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून वाहतुकीचा व वाराईचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. पुरवठादाराने खरेदी विभागाच्या सुचनेनुसार निर्देशित केलेल्या ठिकाणी तुपाचे डबे उतरवावे. अन्यथा डबे उतरवल्यास सदरील तुपाचे डबे निर्देशित ठिकाणी पोहचविण्यासाठी लागलेल्या लेबर चार्ज पुरवठादाराच्या बिलातून कपात करण्यात येईल.

१२) निविदेमध्ये नमूद केलेल्या वार्षिक परिमाणापेक्षा जादा गायीच्या तुपाची मागणी न्यासाकडून झाल्यास गायीच्या तुपाचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे बंधनकारक राहील.

१३) न्यासाला पुरविण्याचे गायीचे तूप न्यासाने विनिर्देश (Specification) केल्यानुसार नमुनाबरहुकूम शुध्द, उत्तम प्रकारचे पुरवावे लागेल. विनिर्देशानुसार दुय्यम वा कमी दर्जाचे गायीचे तूप किंवा खराब गायीचे तूप स्वीकारले जाणार नाही. अशा गायीच्या तुपाचा पुरवठा केल्यास तो स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे निविदाकारावर बंधनकारक राहील. अन्यथा गायीच्या तुपाची नासधूस झाल्यास त्यासाठी न्यास जबाबदार राहणार नाही. खराब गायीच्या तुपाची देयके अदा केली जाणार नाहीत.

१४) निविदा प्रक्रियेमध्ये स्वीकृत केलेले दर वर्षभरासाठी अथवा पुढील पुरवठादाराची नेमणूक होईपर्यंत कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव ठेका कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार नाही. आपण गायीचे तूप पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा गायीच्या तुपाचा पुरवठा न केल्यास आपली पुर्णत: किंवा अंशत: बयाना/बॅक गॅरेंटीमधील रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

१५) निविदाकाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून कमाल ५ दिवसात गायीच्या तुपाचा पुरवठा करणे आवश्यक असेल. विहित मुदतीत गायीच्या तुपाचा पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण/नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजारभावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचे गायीचे तूप खरेदी करण्याचे अधिकार/मुभा असेल. बाजारभावाने

खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रकमेची भरपाई पुरवठादारास करावी लागेल. सदर भरपाई देयकाच्या रकमेतून वा बयाना रकमेतून करण्यात येईल.

१६) देयकामध्ये मूळ दर व अतिरीक्त कर असा उल्लेख करावा. प्रचलित नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल. देयक सादर करतांना देयकात, खरेदी आदेशानुसार तुपाचा पुरवठा केल्याप्रमाणे देयक सादर करावे.

१७) पुरवठा करण्यात आलेल्या गायीच्या तुपाची तपासणी करून, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. गायीच्या तुपाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

१८) गायीच्या तुपाचा पुरवठा आदेश व देयकाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाचे न्याय संवाद कक्षेत राहील.

१९) कार्यादेशाच्या दिनांकापासुन एका महिन्याच्या आत समक्ष येवून स्टॅम्पपेपरवर करारनामाचे प्रारूप न्यासास सादर करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग म्हणून ग्राह्य धरण्यात येतील. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. .

२०) बयाना रक्कम/बॅक गॅरेंटी गायीच्या तुपाचा पुरवठा करार संपल्यावर ९० दिवसानंतर परत केली जाईल. बयाना रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२१) आपात्कालीन परिस्थितीत ई–निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

२२) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाकाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

२३) गायीचे तूप पाठविताना रविवार व मंगळवार खेरीज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता पाठविण्याची दक्षता घेणे आवश्यक असेल. रविवार व मंगळवार या दिवशी गायीचे तूप उतरवून घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. न्यासाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत गायीचे तूप उतरविण्यात यावे. परस्पर गायीचे तूप उतरवून दिल्यास सदर तुपाच्या हिशोबाची व प्रदानाची जबाबदारी न्यासावर राहणार नाही.

२४) ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल. निविदाधारकांच्या ऑनलाईन कागदपत्रांच्या पुर्ततेसंबधात तांत्रिक निविदेमध्ये अनावधानाने कागदपत्राची पुर्तता राहिल्यास सदरील कागदपत्रे तांत्रिक निविदा उघडताना समितीच्या उपस्थितीत त्यांच्या मान्यतेने निविदाधारकाच्या पात्रतेकरीता ग्राहय धरण्यात येईल.

२५) ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय.MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

२६) ई–निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बॅकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी.

२७) ई–निविदेसोबत राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. पतदारी दाखला न्यासाने निविदेत नमुद केलेल्या रक्कमेनुसार असावा. तसेच निविदाधारकाची आर्थिक उलाढाल ही निविदेतील पृ. क्र. ४ मध्ये नमुद तक्त्यानुसार किमान रक्कमेपेक्षा जास्त असावी.

२८) निविदाकारास कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थेमध्ये मालाचा पुरवठा प्रकरणी काळया यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्या विरूध्द न्यायालयात कोणताही दावा अथवा प्रकरण प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

२९) ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. अपूर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापन समितीवर बंधनकारक राहणार नाही.

३०) महाप्रसादाकरीता लागणाऱ्या गायीच्या तूपाचा पुरवठा सातत्याने व वेळेतच होण्यासाठी गायीच्या तुपाचे निविदाधारक/उत्पादक यांचे **प्लांन्ट हे महाराष्ट्र राज्यात असणे आवश्यक आहेत.**

३१) **गायीच्या तुपाच्या गुणवत्तेचा, प्रयोगशाळा तपासणी अहवाल तसेच पान क्र. ७ वर नमूद गुणतालिकेचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. केवळ न्युनतम दर प्राप्त झाला म्हणून निविदा स्विकारण्याचे बंधन न्यासास/समितीस असणार नाही.**

३२) तपासणीसाठी गायीच्या तुपाचे नमुने न पुरविणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३३) **ई–निविदेसोबत वर नमुद केलेली कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहेत. कागदपत्राची पुर्ततेनंतरच मुल्य निविदा (वाणिज्यिक–COMMERCIAL) उघडण्यात येईल.**

३४) निविदापुर्व बैठकीस निविदाकार अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहील याची काळजी घ्यावी. यासंदर्भात खालील नमूद क्रमांकावर संपर्क साधावा. निविदेच्या अनुषंगाने निविदाकारास कोणत्याही आवश्यक माहीती साठी खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | |
|---|---|
| **श्रीमती वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी** | ९९३०९४२४२८ |
| **डॉ.संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी** | ७९७७७५३७१६ |
| **श्री. मंगेश कुंटे, पर्यवेक्षक** | ९७०२०२०३४२ |

Vpatil
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी